# [illegible] “[illegible] [illegible] [illegible]”

[illegible]: [illegible], [illegible] [illegible] [illegible]

[illegible]: [illegible], **aglegal02@gmail.com**

[illegible] [illegible]:- [illegible], [illegible] - [illegible].

लेखकाचे मनोगत -

"खडीकोळवण" हे फक्त एक आठवणींचं पुस्तक नाही, तर ते माझ्या बालपणाचा आत्मा आहे. माझा जन्म गावात झाला, वयाची ६ वर्ष गावात गेली, माझी आजी कै.पार्वती गंगाराम घोलम हिने मला गावाबद्दल, देवा बद्दल जे माझ्या लहान वयात माझ्या मेंदूवर बिंबवले तेच माझे जीवन झाली. मी गेली अनेक वर्ष काही अडचणीमुळे गावाकडे फिरकलो नाही, पण माझ्या आजीने बिंबवलेले गाव माझ्या मनातून कधीच पुसले गेलेच नाही.गावात आता पाहिल्यासारखे दिवस राहिले नाही. गावपण गावानेच हरविले असे जाणवत आहे. गावाच्या हितासाठी जे काही करता येईल ते केले, हे करीत असताना अनके शत्रू निर्माण केले. पण मनात विचार होता “गावासाठी काय पण...” आज हि अनेक लहानपणी गावाकडं गेलेल्या प्रत्येकाच्या मनात असे अनेक कोपरे असतात जे अजूनही ताजे, नाजूक आणि आपलेसे वाटतात. मी तेच क्षण या पुस्तकातून पुन्हा जगण्याचा प्रयत्न केला आहे.

गावाच्या उन्हात पाय भाजत चालणं, शिडकाव्याचं थंड पाणी, आणि पाणवठ्यावरच्या गप्पा... या सगळ्या गोष्टी एकत्र करून मी हे लहानसं पण मनापासून लिहिलेलं पुस्तक तुमच्यासमोर ठेवत आहे.

हे पुस्तक म्हणजे एका साध्या जीवनशैलीचं चित्रण आहे – जिथे मोबाईल नव्हते, पण संवाद होता; जिथे खेळणी कमी होती, पण खेळ भरपूर होते. जिथे वाद नव्हता पण माणुसकी होती.

वाचकांनी हे पुस्तक वाचून जर त्यांच्या बालपणाच्या गावाकडच्या आठवणी जाग्या झाल्या, तर माझं लिखाण सार्थक झालं असं मी समजेन.

लेखक, वकील - अनंत सखाराम घोलम, - मुंबई उच्च न्यायालय.

संपर्क - ९२८४८९६९२२, Email - aglegal02@gmail.com

भाईंदर पुर्व - जिल्हा - ठाणे, पिन - ४०११०५.

दिनांक – १२.०७.२०२५.

-: प्रस्तावना:-

सौ. अनघा अनंत घोलम, प्रतिक अनंत घोलम व आकाश अनंत घोलम यांच्या वतीने;

खडीकोळवण... फक्त एक गाव नाही, तर आमच्या अस्तित्वाचं, आमच्या आठवणींचं, आणि आमच्या संस्कृतीचं केंद्रबिंदू आहे. या गावातील मातीचा गंध, झाडांची सावली, ओढ्याचं पाणी, आणि माणसांची माया — हे सगळं आमच्या मनात खोलवर रुतलेलं आहे.

आज जरी जग वेगाने बदलत आहे, डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून साऱ्या गोष्टी मोबाईलच्या स्क्रीनवर उतरल्या असल्या, तरीही आपलं गाव, आपली संस्कृती आणि आपली ओळख टिकवणं ही काळाची गरज बनली आहे.

हीच भावना मनात ठेवून, आमच्या लहानशा खडीकोळवण गावाचा एक सांस्कृतिक, ऐतिहासिक व सामाजिक दस्तऐवज म्हणून हा लेख तयार करण्यात आला आहे. आम्हाला अभिमान आहे की, या माध्यमातून खडीकोळवणची ओळख जगभर पोहचू शकते.

हा लेख म्हणजे केवळ माहितीचं संकलन नाही, तर गावाच्या आठवणींचा ठेवा, स्मृतींचा संग्राह आणि पिढ्यानपिढ्यांना जोडणारा सेतू आहे. यामध्ये गावाचा इतिहास, परंपरा, निसर्ग, आणि माणुसकीची मोलाची गुंफण आहे.

खडीकोळवणच्या प्रत्येक वाचकाला, चाकरमान्याला, अभ्यासकाला, आणि नव्या पिढीला हा लेख प्रेरणादायी ठरेल, गावाच्या मुळाशी जोडणारा ठरेल, हीच आमची प्रामाणिक इच्छा आहे.

या लेखाच्या निमित्ताने आपल्या गावाचा सन्मान वाढो, आणि ही ओळख पुढील पिढ्यांसाठी कायमस्वरूपी जपली जावी, हीच सदिच्छा.

सौ. अनघा अनंत घोलम, प्रतिक अनंत घोलम, आकाश अनंत घोलम

© 2025 Adv.Anant Gholam. सर्व हक्क राखीव.

या पुस्तकातील सर्व मजकूर, प्रसंग, वर्णन, कथा, अनुभव हे लेखकाच्या मूळ विचारांचे व लेखनाचे गाव मालकीचे हक्क आहेत. कोणतीही प्रतिकृती, पुनर्प्रकाशन किंवा कोणत्याही स्वरूपात वापर लेखकाच्या परवानगीशिवाय करू नये.

प्रकाशन: स्व-प्रकाशन (Amazon Kindle Direct Publishing)

अनुक्रमणिका:-- (गावाचा पुरातन इतिहास) --

१. इतिहास व नावाची उत्पत्ती --

२. भौगोलिक माहिती --

अ)स्थळ आधारित पर्यावरण धोरणे व स्थानिक परिणाम--

ब) गावातील प्रसिद्ध निवये (शेती क्षेत्र)--

क) गंधकयुक्त गरम पाण्याचा झरा,नैसर्गिक संसाधने--

३. भातशेतीचे प्रमुख शेतमळे--

४. ग्रामदैवत व धार्मिक परंपरा--

५. मार्लेश्वर दर्शन--

अ) मंदिर वैशिष्ट्ये --

ब) पर्यटन आणि आकर्षणे--

क) वर्गीकरण व विकास--

ड) कसे पोहोचाल--

६. दळणवळण व संपर्क मार्गांचा इतिहास--

७. एस.टी. सेवा --

८. हवामान--

९. धार्मिक व सांस्कृतिक--

१०. गावातील वाड्या--

११. आडनावे, ज्ञाती आणि जुनी दुकाने--

१२. बाराबलुतेदार पद्धती--

१३. गावात पहिला दुधाचा चहा--

१४. परंपरागत शेतीपद्धती व ग्रामजीवन--

१५. नाचणी शेती व पारंपरिक कृषिसंस्कृती--

१६. रानभाज्या व रानमेवा--

अ) पावसाळ्यात नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या भाज्या --

१७. पुर्वीची शेतीची "आढी" पद्धत--

१८. बैलांची शिकवणी, शेतीची अवजारे--

१९. प्रेक्षणीय स्थळे--

२०. आसपासचे गड-किल्ले --

२१. प्राकृतिक वैविध्य आणि जंगलसफारी--

२२. जिल्हा परिषद पुर्व प्रा.मराठी शाळेचा अमृतमहोत्सव--

२३. प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे --

२४. भारतीय युद्धात सहभागी (शूर योध्ये)--

२५. वन्यजीवनातील निपुणता--

२६. उल्लेखनीय व्यक्तिमत्व--

२७. समसामयिक सामाजिक स्थिती --

२८. पारंपरिक वेशभूषा--

२९. खाद्यसंस्कृती--

३०. सामाजिक व सांस्कृतिक जीवन--

३१. गावातील सांस्कृतिक परंपरा--

३२. कलगी / शक्तीवाले परंपरा --

३३. निरक्षर स्त्रियांचे जीवन व योगदान --

३४. शेती आणि स्थलांतर --

३५. मिरगाची राखण – रखवाली--

३६. परंपरागत जलव्यवस्था --

३७. मासेमारीची पारंपरिक पद्धत--

३८. पारंपरिक साकव व शेती कामकाज--

३९. इतिहासातील हरवलेली कुटुंबे व पारंपरिक जीवनपद्धती--

४०. पारंपरिक जीवनशैली व स्थानिक कारागिरी --

४१. सांस्कृतिक व धार्मिक उपक्रम जतन--

४२. तंटामुक्त गाव अभियान --

४३. आंतरराष्ट्रीय निबंध स्पर्धा विजेता --

खडीकोळवण हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी
जिल्ह्याच्या संगमेश्वर तालुक्यातील एक गाव आहे. हे गाव सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या कुशीत वसलेले असून, कोकणातील एक पारंपरिक व ऐतिहासिक महत्त्व असलेले स्थळ म्हणून ओळखले जाते. या गावात एक नैसर्गिक गंधकयुक्त गरम पाण्याचा झरा आहे, जो पश्चिम घाटातील पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात समाविष्ट आहे. “Western Ghats”, “Sulphur hot spring”, “Eco-Sensitive Area” गावाचा इतिहास सुमारे तीनशे वर्षांहून अधिक कालखंडाचा असल्याचा उल्लेख मिळतो गावाची स्थापनाकालावधी अंदाजे ४ 00 वर्षे अधिक २०११ जनगणना नुसार लोकसंख्या ३४४ (११८ घरं, साक्षरता ६३.२४%).

या परिसरात श्री देव गांगेश्वर, अत्रल देवी आणि ठोंगळ देवी यांची मंदिरे आहेत. तसेच, गावात नैसर्गिक गरम पाण्याचे झरे असून, हे परिसराचे वैशिष्ट्य ठरते. गावाजवळील श्री मार्लेश्वर गुहामंदिर हे धार्मिकदृष्ट्या प्रसिद्ध असून भाविकांची येथे नियमित वर्दळ असते.गाव अधिकतम कुणबी समाज व बौद्ध वस्ती यांवर आधारित आहे. खडीकोळवण हे पारंपरिक कोकणी संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे, ग्रामविकास व सामाजिक परिवर्तन यांचे उदाहरण ठरलेले गाव आहे.

१. इतिहास व नावाची उत्पत्ती...

खडीकोळवण गावाची सुरुवात पारंपरिक वस्ती पद्धतीतून झाल्याचे
दिसते. प्रारंभी येथे कुडाची, शेणमातीने सारवलेली घरं, शेतीपूरक वाडे आणि ओढ्यांजवळील निवास होते. गावाच्या शेजारील गावांशी व्यापार, धार्मिक उत्सव व मुक्कामासाठी येणाऱ्या प्रवाशांमुळे खडीकोळवणला स्थानिक दळणवळण व देवदर्शन केंद्राचं स्वरूप लाभलं.

गावाजवळून वाहणारी बाव नदी व इतर लहान ओहोळ यांमुळे शेतीस पोषक भौगोलिक परिस्थिती तयार झाली. तथापि, या नद्यांमुळे निर्माण होणाऱ्या पूरस्थिती आणि कालांतराने शैक्षणिक व औद्योगिक संधींसाठी झालेल्या स्थलांतरामुळे पारंपरिक जीवनपद्धतीत काही प्रमाणात बदल झाले.

गावात पूर्वी पंचनियाय प्रणाली कार्यरत होती. होळी, शिमगा व गणपतीसारख्या सणांमध्ये ग्रामपंचायतीच्या सहकार्याने गावातील पंच एकत्र येऊन निर्णय घेत. मानपान आधारित परंपरांचा अंगभूत भाग असलेले हे उत्सव ग्रामस्थांनी एकोप्याने साजरे केले.कालांतराने काही सामाजिक मतभेद व बदलांच्या पार्श्वभूमीवर या परंपरांमध्ये थोडेसे बदल दिसून आले.

२. भौगोलिक माहिती...

खडीकोळवण गाव महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी जिल्ह्याच्या संगमेश्वर तालुक्यात स्थित आहे. हे गाव सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेलं असून चारही बाजूंनी डोंगरांनी वेढलेलं आहे.

गावाच्या सीमा: -

• पश्चिमेस – बामणोली
• दक्षिणेस – निवधे
• पूर्वेस – ओझरे
• उत्तर व ईशान्येस – उदगीर, कोल्हापूर जिल्हा सीमा

खडीकोळवण गाव हे सह्याद्रीच्या पायथ्याशी वसलेले असून, अंदाजे
१७व्या शतकातील वस्ती मानली जाते. गावाच्या सीमेवरून वाहणारी बाव नदी व इतर ओहोळ यामुळे या परिसरास शेतीस पोषक भौगोलिक लाभ मिळतो. पावसाळ्यात नदीमुळे पूरस्थिती निर्माण होते. गावाजवळून जाणारा पुरातन घाटमार्ग – **"म्हातारी वाट"** आजही काही स्थानिक जुने ग्रामस्थ शेतीसाठी वापरतात.

सन १९९० नंतर जंगलतोड मोठ्या प्रमाणावर झाल्याने जैवविविधतेवर
परिणाम झाला आहे. यामुळे बिबट्या व इतर वन्यप्राणी गावाजवळ दिसू लागले आहेत. यामुळे ग्रामस्थांमध्ये संध्याकाळच्या सुमारास भीती निर्माण होते. खडीकोळवण हे चिपळूण विधानसभा मतदारसंघ मध्ये येते.

अ) स्थळ आधारित पर्यावरण धोरणे व स्थानिक परिणाम---

खडीकोळवण हे महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील
संगमेश्वर तालुक्यातील एक गाव आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या गावात निसर्गसंपन्नता आणि जैवविविधतेमुळे केंद्र सरकारने हे गाव पश्चिम घाट इको-संवेदनशील क्षेत्र (Western Ghats ESA) म्हणून घोषित केले आहे. भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने 2014 साली प्रसिद्ध केलेल्या मसुद्यात रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर, राजापूर आणि चिपळूण तालुक्यातील एकूण 221 गावे ESA मध्ये समाविष्ट केली आहेत. त्यात खडीकोळवण गावाचाही समावेश आहे. इको-संवेदनशील क्षेत्रातील नियमावली-- सदर अधिसूचनेनुसार या क्षेत्रात पुढील गोष्टींवर बंदी घालण्यात आली आहे:

• नवीन खाण प्रकल्प, थर्मल पॉवर प्रोजेक्ट्स
• विद्यमान उद्योगांचे विस्ता

• मोठ्या पाण्याचे अडथळे, मोठ्या इमारतींचे बांधकाम (बांधकाम क्षेत्र 20,000 चौरस मीटरपेक्षा अधिक)
• जंगल तोड अथवा जैवविविधतेला धोका निर्माण करणाऱ्या कृती

या क्षेत्रांत फक्त पर्यावरणपूरक विकास, शाश्वत शेती, स्थानीय जीवनशैलीचे रक्षण, व पर्यटन क्षेत्रातील शाश्वत उपक्रम प्रोत्साहित करण्यात येणार आहेत. स्थानिक ग्रामस्थांचा विरोध... या निर्णयाला स्थानिक ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणावर विरोध आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की: -- या निर्णयामुळे त्यांची पारंपरिक शेती व घर बांधणीवर मर्यादा येतील. पर्यटन व्यवसाय, शेतीपूरक उद्योग, शासकीय योजनांचे अंमलबजावणी यावर परिणाम होईल. स्थानिकांना पूर्व सूचना, विश्वासात न घेता निर्णय घेण्यात आले.

गावांची यादी..... रत्नागिरी जिल्ह्यातून ESA अंतर्गत समाविष्ट झालेल्या गावांची संख्या: --

चिपळूण – ४४ गावे

राजापूर – ५२ गावे

संगमेश्वर – ८२ गावे

खडीकोळवण हे संगमेश्वर तालुक्यातील अंतर्भूत गाव आहे.

ब) गावातील प्रसिद्ध निवये (शेती क्षेत्र) -

खडीकोळवण गावातील शेतीसाठी प्रसिद्ध निवये सपाट शेती विभाग पुढीलप्रमाणे आहेत: --१. कळ्याची निवय २. गुरवयाची निवय ३. वाड्याची निवय ४. कोबीची निवय ५. बोडणी निवय ६. पन्हाळ्याची निवय ७. बावळ्याची निवय ८. महारलाईची निवय ९. वतन निवय १०. आघाडा निवय ११. मैची निवय १२. पालडीयो निवय
१३. केळीची निवय १४. घाणमरा निवय १५. जागलदरा निवय या सर्व “निवय" भागांमध्ये गवताळ स्वरूप, गडद सुपीक माती, लहानशा झाडझुडपांचे जंगल आणि समृद्ध जैवविविधता आढळते. आढळते. याठिकाणी अनेक पक्षी व प्राणी विहार

करतात. त्यामुळे काही निवय भाग सध्या पर्यावरणीय दृष्टिकोनातून **अभयारण्य क्षेत्र** म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत.

क ) नैसर्गिक संसाधने...

खडीकोळवण, तालुका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी या गावात २०१४ साली झालेल्या भू-वैज्ञानिक अभ्यासादरम्यान गंधकयुक्त गरम पाण्याचा झरा आढळून आला. महाराष्ट्र शासनाच्या भू-गर्भ संशोधन कार्यक्रमांतर्गत कोयना भूकंप क्षेत्राशी संबंधित निरीक्षणासाठी येथील जमिनीमध्ये खोलवर ड्रिलिंग करण्यात आले. त्यावेळी सुमारे १०४५ मीटर खोलवर गरम पाणी वाहताना आढळले. नंतर १२०० मीटरपर्यंत खोदाई करण्यात आली, जिथे भूगर्भीय हालचालींचे निरीक्षणासाठी उपकरणे बसवण्याचा प्रयत्न झाला, मात्र उष्णतेमुळे ती प्रक्रिया अयशस्वी ठरली.

या झऱ्याचे काही वैशिष्ट्ये:-

• पाण्यामध्ये गंधकाचे प्रमाण अधिक असून ते पिण्यास अथवा शेतीसाठी वापरण्यास अयोग्य आहे.
• या पाण्यावर भाजीपाला लागवडीचा प्रयोग अयशस्वी ठरला आहे, कारण पाण्याचे तापमान झाडांना सहन होत नाही.
• मात्र, स्थानिकांच्या मते या पाण्यात आंघोळ केल्यास त्वचारोगांवर आराम मिळतो, अशी परंपरागत धारणा आहे.

या झऱ्यामुळे गावातील भूजल पातळी वाढलेली असल्याचे निरीक्षण आहे. या उत्खननादरम्यान, हैद्राबाद भू-वैज्ञानिक विभागाच्या पथकाने सात महिने निरीक्षण केले. त्यात मोठ्या प्रमाणावर पिवळ्या गंधकाचा साठा सापडला असून त्याचे हजारो टन कच्च्या स्वरूपात संकलन करण्यात आले आहे. आजही या ठिकाणी मोठ्या प्रवाहाने गंधकयुक्त गरम पाणी सतत वाहत आहे.

हा झरा वज्रेश्वरीच्या गरम पाण्याच्या कुंडांप्रमाणे नैसर्गिक गरम झऱ्यांचे उदाहरण मानला जातो. यामुळे हा भाग पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरू शकतो. विशेषतः खडीकोळवणमधील गांगेश्वर मंदिर आणि परिसर

पर्यटनासाठी विकसित केला जाऊ शकतो, अशी शक्यता स्थानिक स्तरावर व्यक्त होत आहे.

३. भातशेतीचे प्रमुख शेतमळे--

खडीकोळवण गावातील भात शेतीसाठी प्रसिद्ध मळ्यांची यादी
पुढीलप्रमाणे आहे:-

१. ठोंगळीचा मळा २. अत्रालीचा मळा ३. पयलीकडचा मळा ४. साकव मळा ५. वाड्याकडचा मळा ६. भाजीचा मळा ७. वाज्या फणसाचा मळा ८. भूरावणीचा मळा ९. नवोरलाचा मळा १०. देवरायचा मळा ११. खोप्याचा कातळ मळा १२. जलावंडा मळा १३. पायरवणं १४. पासोडीचा मळा १५. किजळवन मळा १६. देवाचा मळा.

या मळ्यांमध्ये पूर्वीपासून भात, नाचणी, मिरची, व विविध हंगामी पिके घेतली जात. भातशेतीसाठी तरवा तयार करणे, म्हणजेच पालापाचोळा व गोवऱ्या जाळून माती तयार करून रोपांची पात असलेली शेती, हा एक पारंपरिक व शाश्वत पद्धतीने केला जाणारा शास्त्रशुद्ध उपाय होता.

या मळ्यांमध्ये पारंपरिकपणे भात, नाचणी, मिरची आणि विविध हंगामी
पिके घेतली जात. 'तरवा' तयार करणे म्हणजे पालापाचोळा, गवत व गोवऱ्या जाळून जमिनीत खतयुक्त माती तयार करणे, ही शाश्वत व पारंपरिक पद्धत होती. ही पद्धत रोपवाटिका तयार करण्यासाठी वापरली जात होती.

पूर्वी ठोंगळीपासून सह्याद्रीच्या कुशीतून वाहणाऱ्या नदीच्या
दोन्ही काठांवर ही भातशेती विस्तारलेली होती. आज या क्षेत्रात वन विभागाच्या संकल्पनेनुसार काही मळे 'संवर्धन क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आले आहेत.

४. ग्रामदैवत व धार्मिक परंपरा **--**

खडीकोळवण गावातील सर्वात जुने व पुरातन धार्मिक स्थळ म्हणजे श्री देव गांगेश्वर मंदिर होय. हे मंदिर गावाचे ग्रामदैवत असून, सह्याद्रीच्या कुशीत वसलेले आहे.

गावात अजूनही अनेक धार्मिक परंपरा पाळल्या जातात, ज्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या आहेत.

या प्रमुख देवस्थानांमध्ये :--

- श्री देव गांगेश्वर (ग्रामदैवत)
- श्री. अत्रल देवी
- श्री. ठोंगळ देवी

या तीन देवस्थानांना विशेष श्रद्धास्थान मानले जाते. या ठिकाणी दरवर्षी धार्मिक सण व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.

प्रमुख सण व धार्मिक आयोजन :--

• श्रीराम नवमी – रामवाडी येथील शिवगण परिवार यांच्यातर्फे भव्य आयोजन
• श्री हनुमान जयंती – शिवगण कुटुंब व इतर ग्रामस्थांद्वारे
• श्री सत्यनारायण पूजन – खाडे, घोलमवाडी, व रामवाडी कुटुंबांद्वारे
• अत्रल देवी उत्सव – खालचे घोलम कुटुंब आयोजित
• गौर गणपती व शिमगा उत्सव – गावातील सार्वजनिक मंडळांद्वारे साजरे होणारे
• गोंधळ उत्सव परंपरा – शिवगण कुटुंबीयांमार्फत

या सर्व परंपरांमधून गावाचा सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक एकोप्याचा वारसा स्पष्टपणे दिसून येतो.

५. मार्लेश्वर दर्शन--

खडीकोळवण गावाच्या पश्चिमेस "मुक्काम-मार्ल" हे गाव असून, तेथे सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेले, श्री. मार्लेश्वर हे प्रसिद्ध शिवमंदिर आहे. हे एक स्वयंभू शिवमंदिर असून, कोकणातील एक पवित्र व ऐतिहासिक गुहामंदिर मानले जाते.

कोकणातील प्रसिद्ध देवस्थान – श्री देव मार्लेश्वर, स्वयंभू शिवलिंग, जागृत देवस्थान

अ) मंदिर वैशिष्ट्ये -

मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे ५३० पायऱ्या चढाव्या लागतात. त्यामुळे हे ठिकाण ट्रेकिंग प्रेमी व भक्तांसाठी आकर्षण ठरते.रत्नागिरी / मुंबईकडून येताना देवरूख मार्गे मारळपर्यंत अंदाजे १८ किमी आणि नंतर साधारण एक किलोमीटरचा चढ ५३० पायऱ्या चढून पोहोचता येते. मंदिरापाठीमागे धबधबा (धारेश्वर) वाहतो जो पावसाळ्यात विशेष मनोहारी दृश्य निर्माण करतो.

परशुरामांनी हे मंदिर स्थापल्याची धार्मिक श्रद्धा आहे. गुहेत साप (कोब्रा) असल्याचा समज असून, ते भक्तांना हानी पोहोचवत नाहीत, अशी श्रद्धा आहे. महाशिवरात्र व मकरसंक्रांती हे सण येथे मोठ्या श्रद्धेने साजरे होतात. मंदिर परिसरात प्राचीन निसर्ग व जैवविविधता आढळते.

ब) पर्यटन आणि आकर्षणे--

मार्लेश्वर हे खडीकोळवणपासून सुमारे ९ किमी आणि देवरूखपासून सुमारे
२४ किमी अंतरावर आहे. ते सह्याद्री पर्वतरांगेतील निसर्गरम्य आणि धार्मिक स्थळ आहे, जिथे शिवगुहा व बारमाही धबधबा आहे. परिसरात **शाळा- कार्यालयीन सहली** व ***सह्याद्री ट्रेकर*** मोठ्या संख्येने येतात. विशेषदिनी (शनिवार, श्रावण मास, मकरसंक्रांती) येथे धार्मिक संमेलनाची गर्दी वाढते. “स्थानिक व पर्यटक अभिप्रायात ‘क वर्ग’ म्हणून पाहिले जाते” हे मंदिर भारतातील लोकांसाठी श्रद्धास्थान आहे.

क) वर्गीकरण व विकास--

शासन किंवा पर्यटन विभागाने अधिकृत ‘क’ वर्ग म्हणून हे स्थान घोषित केल्याचे तथ्य सार्वजनिक स्त्रोतांतून आढळत नसले तरी पर्यटकांच्या दृष्टीने हे निसर्ग-धार्मिक स्थळ स्वरूपात पर्यटनासाठी उपयुक्त आहे.

गावासमोरील श्री गांगेश्वर मंदिर परिसर विदेशी तसेच देशी पर्यटक आकर्षित करू शकते, आणि पर्यटनाच्या दृष्टीने या भागाचा विकास करण्यास शक्यता आहे

ड) कसे पोहोचाल --

मुंबईपासून खडीकोळवण सुमारे ३८४ कि.मी. आहे.कोल्हापूरहून अंतर: साधारण १४५ कि.मी.संगमेश्वर रेल्वे स्टेशन हे सर्वात जवळचे कोकण रेल्वे स्टेशन आहे. तेथून देवरुख – साखरपा – खडीकोळवण असा प्रवास करावा लागतो. एस.टी. सुरू होण्याअगोदर ग्रामस्थ कलकदरा घाट उतरून तासभर पायी गावात पोहोचत.बाजारपेठ: - साखरपा (सुमारे १ तास)

प्रशासकीय मुख्यालय: - देवरुख (१७ किमी)

मंदिर स्थळ : - मार्लेश्वर गाव .

६) दळणवळण व संपर्क मार्गांचा इतिहास --

खडीकोळवण हे सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेले गाव असल्यामुळे पूर्वीच्या काळात येथे पोहोचणे अत्यंत अवघड होते . बस सेवा , पक्का रस्ता यांसारख्या मूलभूत सुविधा केवळ स्वप्नवत होत्या .

१) पायवाट व पारंपरिक रस्ते: गावात फक्त पायवाटांद्वारेच प्रवास
शक्य होता. आंबा गाव ते कळकी-दरी फाटा असा जंगलामधून जाणारा एकमेव अडथळ्यांचा मार्ग होता. बामणोली, ओझरे, निनावे, खडीकोळवण ही गावं जोडणारी "कलकदरा वाट" हीच एकमेव सजीव संपर्काची वाट होती, जी उभी आणि घनदाट जंगलातून जाणारी होती.

२) डोलीद्वारे रुग्णवाहतूक: - आजारपण किंवा प्रसूतीच्या वेळी
रुग्णांना डोलीतून (पालखीसदृश झोळी) उचलून, सुमारे ७ किमी जंगल आणि डोंगर चढून, कलकदरा मार्गे देवरुखच्या सरकारी दवाखान्यात नेलं जाई. यामुळे अनेक वेळा उपचार न मिळाल्यामुळे दुर्दैवी मृत्यू झाले.

३) पहिला कच्चा रस्ता: - १९७० च्या दशकात श्री. शंकर खाडे यांच्या पुढाकाराने मलकापूरहून आलेल्या एका लाकूड व्यापाऱ्यासाठी कळकदरा– खडीकोळवण मार्गावर पहिला ओबडधोबड कच्चा रस्ता तयार झाला.

यानंतर गावात कडिपत्ता, वावडिंग, करवंद, बांबू आदी वनसंपत्तीचा
व्यापार सुरू झाला.

४) सध्याचे रस्ते व प्रगती: - प्रारंभीचा रस्ता फक्त उन्हाळ्यात
वापरता येत असे, पावसाळ्यात वाहून जात असे. मात्र गावकऱ्यांनी श्रमदानातून आणि जिल्हा प्रशासनाच्या सहाय्याने पक्का डांबरी रस्ता उभा केला. आज गाव रस्त्याने साखरपा–देवरुख या मुख्य मार्गाशी जोडले गेले आहे.

७) एस.टी. सेवा -

१९८० साली पहिल्यांदा येथे एस.टी. बस सेवा सुरू झाली. त्या अगोदर
गावात पोहोचण्याचा मुख्य मार्ग म्हणजे पायवाट, डोंगर चढण व जंगल मार्ग होता. स्थानिक स्मरणिकेनुसार, पहिल्या एस.टी. गाडीच्या येण्याच्या बातम्यांमुळे गावात उत्सुकता आणि उत्साह निर्माण झाला होता. ग्रामस्थांनी धर्माजी घोलम यांच्या सांगण्यानुसार गाडीच्या स्वागतासाठी तयारी केली होती. अनेकांनी शाळेच्या आवारात जमून आरत्या, फुलं, ढोल-ताशांच्या माध्यमातून स्वागत करण्याची तयारी केली होती.

परंतु सुरुवातीस आलेले वाहन एस.टी. नसून लाकडांचा ट्रक (हौदा) निघाला.त्यानंतर प्रत्यक्षात एस.टी. सेवा गावात पोहोचली आणि दोन तासांच्या विश्रांतीनंतर परत गेली. ही घटना गावाच्या दळणवळणाच्या इतिहासातील एक महत्त्वाची पायरी ठरली. पुढे खडीकोळवण–बामणोली आणि देवरुख–साखरपा मार्गे नियमित एस.टी. सेवा सुरू करण्यात आली. गावात आता दररोज तीन वेळा एस.टी. सेवा उपलब्ध आहे.

१९८५ पूर्वी ग्रामस्थ कलकदरा येथे उतरून गावात सुमारे तासभर पायी प्रवास करीत असत. त्यानंतर स्थानिक ग्रामपंचायत आणि लोकप्रतिनिधींनी केलेल्या पाठपुराव्यामुळे १९८५–१९९० च्या सुमारास साखरपा–खडीकोळवण ही पहिली एस.टी. बस सेवा सुरू करण्यात आली. आजही ही सेवा मासिक मर्यादित फेरीप्रमाणे सुरू आहे, जी गावाला साखरपा, देवरुख आणि संगमेश्वर शहरांशी जोडते.गावाच्या चारही बाजूंनी डोंगर असून, गाव एका विशाल डोंगरांच्या मधोमध खोऱ्यात आहे. पूर्वीचा घनदाट जंगल परिसर आता जंगल तोड झाल्यामुळे विरळ झाला आहे.

८. हवामान --

कोकणात मे महिन्यात सरासरीपेक्षा जास्त तापमान असेल.उष्णतेच्या लाटा नेहमीप्रमाणे असतील.

९. धार्मिक व सांस्कृतिक--

खडीकोळवण गावात पारंपरिक कोकणी ग्रामीण धार्मिकतेचे दर्शन घडवणारी अनेक प्राचीन देवस्थाने आहेत. या देवस्थानांना स्थानिक ग्रामस्थांमध्ये धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक परंपरेचा आधार लाभलेला आहे.

मुख्य देवस्थाने:- श्री देव गांगेश्वर – गावाचे ग्रामदैवत असून,
सामाजिक व धार्मिक उपक्रम याच मंदिराभोवती केंद्रित असतात.

श्री अत्राल देवी मंदिर – ग्रामस्थांमध्ये नवसाला पावणारी म्हणून प्रसिद्ध.

श्री ठोंगळ देवी मंदिर – गावाच्या सीमेलगत वसलेले हे मंदिर, स्थानिक श्रद्धेचे प्रतीक मानले जाते.

गरम पाण्याचे स्त्रोत:- खडीकोळवण गावात गेल्या १५ वर्षांपासून भूमिगत गरम पाण्याचा झरा सतत वाहत आहे. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार या झऱ्याचे पाणी गंधकयुक्त असून त्वचारोगांवर उपयुक्त मानले जाते. त्यामुळे येथे औषधी पर्यटन (Wellness Tourism) क्षेत्रात विकासाची शक्यता निर्माण झाली आहे. निसर्गसंपन्नतेसह ही जलवैशिष्ट्ये गावाला पर्यटकांसाठी आकर्षण ठरवतात.

१०. गावातील वाड्या—

खडीकोळवण गावात खालील वाड्या पुरातन आहेत: -

• घोलम – वरची वाडी (रिंगण वाडी)
• घोलम – खालची वाडी
• खाडे वाडी
• बौद्धवाडी
• रामवाडी

११.आडनावे, ज्ञाती आणि जुनी दुकाने --

गावातील प्रमुख आडनावे: घोलम, ठोंबरे, म्हादे, शिवगण, जाधव, खाडे, भोवड, सुतार, गुरव, गांधी, माडवकर इत्यादी.गावात आढळणाऱ्या प्रमुख ज्ञाती: - कुणबी, बौद्ध, वाणी, वैश्यवाणी, सुतार, गुरव आदी. गावातील पूर्वीची प्रसिद्ध दुकाने:

• वाण्याची गल्लीतील गांधींचे दुकान
• सुर्वेंचे दुकान
• बबन गावकरांचे दुकान
• सितारामचे दुकान

• १२. बाराबलुतेदार पद्धती--

• पूर्वी खडीकोळवणमध्ये वस्तू विनिमय पद्धती होती. प्रत्येक
समाजाच्या विशिष्ट कामामुळे गावगाडा सुरळीत चालायचा. याला बलुतेदारी प्रथा म्हणत. यामध्ये सुतार, सोनार, गुरव, कुंभार, गवंडी, मांग, चांभार, गोसावी इत्यादी जातींनी सामाजिक सेवा दिली. गावातील प्रत्येक घराशी संबंधित कारागीर पिढ्यानपिढ्या कार्यरत होते. उदाहरणार्थ, जाधव, घोलम, सुतार, गुरव आदी कुटुंबांनी समाजात विशेष स्थान मिळवलं.

१३. गावात पहिला दुधाचा चहा—

गावात पूर्वी फक्त कोरा चहा म्हणजेच पाणी व साखरेचा चहा पिण्याची
पद्धत होती. दूध घालून चहा पिणे ही केवळ श्रीमंत मुंबईकरांच्या घरीच दिसणारी लक्झरी मानली जात असे. खडीकोळवण गावात पहिला दूध घालून चहा घेऊन आले ते सदु शिवगण गुरुजी, अंदाजे १९२०–१९२५ च्या सुमारास. गावातील 'सरावधी मास्तर' (सुर्वे गुरुजी) हे दूध–चहा पिणारे पहिले स्थानिक शिक्षक मानले जातात. ही घटना गावातील खाद्यसंस्कृतीतील एक ऐतिहासिक टप्पा मानला जातो.

१४. परंपरागत शेतीपद्धती व ग्रामजीवन

खडीकोळवण हे गाव पारंपरिक शेतीपद्धती व जैवविविधतेसाठी ओळखले जाते. येथे रायवळ, आंबा, काजू, नारळ, फणस, रातांबा (आमसूल), पपई इत्यादींची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. पावसाळ्यात मुख्यतः -- भात, नाचणी, तसेच भाजीपाला शेती केली जाते.

भातशेतीचे पारंपरिक टप्पे:-

१. भात लावणी: पावसाळ्यात नांगरणी झाल्यावर, २०–२५ दिवस वाढलेली भात रोपे लावण्यात येत. ओढे, वहाळ, विहिर यामधून पाणी पानपाटांद्वारे शेतात आणले जाई. मळ्याच्या बांधांवर फुलझाडे व भेंड्याच्या बिया पेरल्या जात.

२. ‘डाल’ पद्धत: गावातील पारंपरिक सहकार्य पद्धती म्हणजे ‘डाल’. दोन
ते तीन शेतकरी एकत्र येऊन एकमेकांच्या भात लावणीस मदत करीत. यामुळे सामाजिक एकोपाही वृद्धिंगत होत असे.

३. श्रमानंतरचा आहार: कामाच्या दरम्यान शेतातच सकाळ - दुपार
भिजलेल्या स्थितीत भाकरी, मासे, वांग्याचे कालवण यासारखा पारंपरिक आहार घेतला जाई. विश्रांतीसाठी मळ्याच्या झाडाखाली किंवा झोपडीत विसावा घेतला जाई.

४. आरोग्य उपचार: शेतकामामुळे होणाऱ्या आजारांवर हळद,
आंबेडा(वनस्पती), तुरटी यांचे पारंपरिक उपचार केले जात.

जैवविविधता:- या भागात अनेक वन्यभाज्या, औषधी वनस्पती, आणि जंगली फळे मिळतात. उदा. घोळ, शेवगापाला, करटोली, रानअळू, करवंद, आंबटफळे इत्यादी. या वनभाज्यांचे स्थानिक आहारात मोठे योगदान असते.

१५. नाचणी शेती व पारंपरिक कृषिसंस्कृती –

खडीकोळवण गावात भातलावणी नंतर पावसाळी डोंगराळ भागात नाचणी (वरकस)
शेती केली जाते. येथील जमिनीचा उतार आणि पर्जन्यमान लक्षात घेता, नाचणी ही पिके सेंद्रिय पद्धतीने घेतली जात.

नाचणीच्या लागवडीसाठी खंडाव पद्धत वापरली जाते. यात दाट जागेत
उगवलेली रोपे उपटून ती विरळ जागी लावतात. या प्रक्रियेस स्थानिक बोलीत "भांगलन" असे म्हटले जाते.

भांगलन आणि पारंपरिक नृत्य भांगलन करताना शेतकरी विशेष पारंपरिक पद्धतीने ‘सापाड नृत्य’ सादर करतात.

या वेळी: - ताशा, ढोल, ताटे वाजवले जातात शेतकरी ढोपरावर बसून, हातात विळा घेऊन गवत कापतात पारंपरिक लयीतील लोकगीते गायली जातात हे सगळे वातावरण एक कृषिपर्व अनुभव देणारे असते. या कार्यात काही कामगार वर्गही "कामगत" म्हणून सहभागी होतो, जे गावामधील मोलमजुरीवर आधारित असते.

१६. रानभाज्या व रानमेवा --

गावकरी पुर्वी आप आपल्या शेतात भाज्या लावायचे तसेच जंगल रानमेवा विपुल रानभाज्यांची व नैसर्गिक अन्नपदार्थांची समृद्ध परंपरा आहे.

यामध्ये शेवरी, घोरकण, टाकळा, चायनीज घोरकण, सुरण, करंडा, रताळी, नागरी फळे, काकडी,भोपळा, पावटा, शेवगा पाला, चवळी, रताळी पानं, पडवळ, दोडका, कारली, वांगी, मिरची, भेंडी, टोमॅटो

अ) पावसाळ्यात नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या भाज्या -

अळंबीप्रमाणे “चितळ”, “जुडी”, “रोवणं” यासारख्या जाती वनसंपदेतून प्राप्त होतात. त्यांचा उपयोग पारंपरिक अन्नात केला जातो. तसेच “रान केळीचे सुवरे”, फणसाचे गर, बकऱ्याच्या मांसासह विशेष प्रसंगी बनवली जाणारी भाजी ही खास वैशिष्ट्ये आहेत.अधिक नेहमीच्या जीवनात वापर असायचा त्यामुळे त्यांचे जगणे ठण ठाणीत होते - निरोगी होते.

१७. पुर्वीची शेतीची "आढी" पद्धत—

पूर्वी गावात "आढी" पद्धतीने फिरती शेती केली जात असे. जंगल जाळून सात वर्षांनी पुन्हा त्या जमिनीवर शेती करीत. नाचणी, वरई, तूर, गवार, भात, आलं, हळद ही पिकं घेतली जात. लाकडी शेती अवजारे जसे नांगर, तिरावडी इ. गावातील सुतार बनवीत असत.

१८.बैलांची शिकवणी, शेतीची अवजारे --

१) नवीन बैलांना जोडी लावणे, जोखड लावणे, आणि खटारा तयार करणे ही प्रक्रिया जुन्या परंपरेप्रमाणे मृग नक्षत्र मध्ये केली जाते. बैलांना "गौरंग", "तरणा", "हातगा' अशा टोपण नावांनी हाक मारली जाते.

२) शेतीची पारंपरिक अवजारे, नांगर, लुमणी, इशाड, तिरावडी, शिवल्या,
खडसा इ. अवजारे रानटी लाकडांपासून तयार केली जातात.

गावातील सुतार काम जयराम सुतार आणि त्यांच्या बंधूंनी
वर्षोंपर्यंत केलं. मोबदल्यात त्यांना शेतकऱ्यांकडून भाताचे माप देण्यात येत असे.

१९. प्रेक्षणीय स्थळे -

श्री देव गांगेश्वर मंदिर – ग्रामदैवत

• अत्राल देवीचे देऊळ – वेशीवरील नवसाला पावणारी देवी
• ठोंगळ देवीचे देऊळ – गावाच्या सीमारेषेवर
• गरम पाण्याचा झरा – नैसर्गिक, गंधकयुक्त पाणी
• श्री मार्लेश्वर मंदिर – प्रसिद्ध गुहामंदिर (45 मिनिटे अंतरावर)
• बाव नदी व डोंगरकुशीतले निसर्ग दृश्य

२०. आसपासचे गड-किल्ले-

प्रतापगड – 55 किमी, शिवकालीन इतिहास..

• भगवती गड, देवगड – समुद्रकिनाऱ्यावर वसलेला किल्ला
• राजापूर प्राचीन किल्ला / अवशेष
• पावस परिसर – परशुराम मंदिर, डोंगर व जंगल.
• सिंधुदुर्ग किल्ला – मालवण समुद्रकाठचा दुर्ग
• विशालगड

२१. प्राकृतिक वैविध्य आणि जंगलसफारी -

गावात ३ ते ४ दशकापुर्ववी वन्य प्राणी आणि पक्ष्यांचे दर्शन घडते: --

• प्राणी - बिबट, तरस, गवारेडे, चितळ, भेकर, साळसिंदर, रानडुक्कर,
खवल्या मांजर, मुंगूस, कोल्हा, रानमांजर, माकड, वानर, शेकरू, घोरपड, सरडे

• सरपटणारे - मण्यार, अजगर, पानसाप, पोणस, घोणस, घोरपड, पाली

• पक्षी - मोर, कोकीळ, कवडा, रानकोंबडा, बगळा, पावशा, बुलबुल, टिटवी,
गरुड, भारद्वाज, सुतार, साळुंखी, धोबी, मैना, घुबड, वटवाघूळ

• वनस्पती - शेवरी घोरकण, नागरी घोरकण, करंडा, सुरण, रताळे, विरंबोळा, जंगली टाका

• मासे - मलाया, पिचकी, वांग, रत्तू, डोकरू, गंडलास, चिगल्या

• पाळीव प्राणी - गाय, बैल, म्हैस, बकरा, शेळी, कुत्रा, मांजर

२२. जिल्हा परिषद पुर्व प्रा.मराठी शाळेचा अमृतमहोत्सव.

खडीकोळवण येथील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळेची स्थापना १२ नोव्हेंबर १९४६ रोजी झाली. शाळेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त १२ नोव्हेंबर २०२१ रोजी अमृतमहोत्सव साजरा करण्यात आला. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर शासन नियमांचे पालन करत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

• कार्यक्रमाचे स्वरूप....

• कार्यक्रमाचे नेतृत्व शिक्षक श्री. शिवाजी पाष्टे यांनी केले. विद्यार्थ्यांनी स्वागतगीत, लेझीम सादरीकरण, व विविध मनोगते सादर केली. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन झाल्यानंतर, कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी शाळेच्या यशाचा आढावा घेणारी स्मरणिका प्रकाशित करण्यात आली व ती

[illegible]

पाटी डोक्यावर नको
हातात द्या.

No Smoking
Area
Smoking here is an offence.
जि.प.पू.प्राथमिक शाळा
खडीकोळवण
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी
सौजन्य शिंगणवाडी ग्रामस्थ मंडळ मुंबई (खडीकोळवण)
Wel-Come

[illegible]....

सन २०२० - २०२१ या लॉकडाऊन काळात श्री. शिवाजी पाष्टे सरांनी
शाळेच्या भिंतींवर शैक्षणिक चित्र व पेंटिंग्स स्वतः तयार केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबरच सौंदर्यदृष्टी व कलेची आवड निर्माण झाली.

ग्रामस्थ व शिक्षकांचे सहकार्य---

* माजी विद्यार्थ्यांची यादी संकलन

* "माझी शाळा, माझा अनुभव" या विषयावर विद्यार्थ्यांचे लेख

* शाळेच्या ७५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेणारी स्मरणिका. हा महोत्सव केवळ शाळेपुरता मर्यादित न राहता, सामाजिक एकतेचे प्रतीक ठरला.

गावात जिल्हा परिषद मराठी पूर्व प्राथमिक शाळेचा विद्यार्थी प्रोहोत्सन देणारा कार्यक्रम पंचक्रोशीत ग्रामस्थ सदस्य व शिक्षक यांच्या अथक प्रयत्नाने यशस्वी पार पडला आहे. गावात माध्यमिक शिक्षण सुविधा नसल्यामुळे पुढील शिक्षणासाठी विद्यार्थी आजूबाजूच्या दुसऱ्या गावात जातात याची खंत ग्रामस्थ यांच्या मनात राहीली.

खडीकोळवण गावात अनेक हरहुन्नरी , निष्ठावान व कर्तबगार ग्रामस्थ होऊन

२३. प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे --

खडीकोळवण गावात अनेक हरहुन्नरी , निष्ठावान व कर्तबगार ग्रामस्थ होऊन गेले , ज्यांनी सामाजिक , शैक्षणिक , सांस्कृतिक आणि ग्रामीण स्वराज्य

व्यवस्थेच्या माध्यमातून गावगाडा मजबूत केला. त्यांचा योगदान पुढीलप्रमाणे: - परिसरात अध्यात्माचा उगम घडविला. हे जागृत सिद्धरामेश्वर देवस्थानाचे महान तपस्वी मानले जातात. १९१० च्या सुमारास त्यांचे पहिले शिष्य भागोजी युवा होते, ज्यांनीच आध्यात्मिक परंपरेचा प्रसार केला. त्यांचे शिष्य प.पू. जयराम बाबा शिवगण हे अलिबागकर महाराजांचे अनुयायी होते. त्यांनी खेडोपाडी कीर्तन, भजन, ग्रंथ वाचन यांची परंपरा सुरू केली. त्यांच्या पुढाकारातून गावात प्रभू श्रीराम मंदिराची स्थापना झाली. जयराम बाबा शिवगण हे पंढरपूरच्या वारकरी परंपरेचे निष्ठावान अनुयायी होते.त्यांनी जीवनात ६० वर्षे पंढरपूरची वारी केली. गुरेढोरे, शेती सांभाळत, ते दररोज जप, तप, पूजाअर्चा करीत. त्यांना पक्षांची भाषा आणि विविध ग्रंथांचे सखोल ज्ञान होते. गावात त्यांनी महाशिवरात्र उत्सव सुरू केला, तसेच श्रावण महिन्यात ग्रंथवाचन परंपरा रुजवली. "एक देव, एक मित्र, एक पत्नी, एक सद्गुरू" असा जीवनविचार त्यांनी दिला.

'कै. सोनू रावजी घोलम (आबा पाटील) -

ब्रिटीश काळापासून गावाच्या कारभारात प्रभावी महत्त्व असलेले,
पट्टीचे व्यायामप्रेमी आणि शिस्तबद्ध स्वभावाचे होते. पाटीलकीचा रुबाब असलेले सोनू घोलम हे देवळे महालातील प्रमुख महालकरी पदाच्या पार्श्वभूमीवर पिढीजात जबाबदारी पार पाडणारे कारभारी होते. त्यांच्या नावाचा दरारा पंचक्रोशीत होता.

कै. देवजी गंगाराम ठोंबरे -

गावातील "गावकर" या संज्ञेचे प्रतिनिधित्व करणारे अत्यंत मान्यवर व्यक्तिमत्त्व. डोंगराच्या पायथ्याशी घर असून, झऱ्याजवळील फुगावणीतून पाणी घेऊन शेती करत, शिस्तबद्ध सामाजिक सहभाग राखणारे होते. फड सांभाळणं, नाचगाणी आयोजित करणं आणि गावच्या निर्णयप्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावणे ही त्यांची ओळख होती.

कै. सखाराम बाळू ठोंबरे -

नमन आणि झांजगी परंपरेचा प्रमुख स्तंभ. स्त्रीवेशातील भूमिका जसे
की ‘राधा’, ‘राणी’ त्यांनी अजरामर केल्या. तमाशा, केवणी, झांजगीत निपुण कलाकार असून, विंचू-सर्पदंश उपचार तंत्रातही पारंगत होते.

'सदाशिव पांचाल -

आयुर्वेदिक मंत्रतज्ञ, मंत्रसाधना, पंचकर्म आणि झपाटलेल्या अवस्थांवरील उपाय यामध्ये निपुण. सर्पदंश व रानऔषधी उपचारांचे गाढे ज्ञान.

जायगडे गुरुजी -

किरबेट संस्थेच्या वतीने आदर्श शेतकरी म्हणून गौरव प्राप्त केलेले. शैक्षणिक-सामाजिक कार्यात प्रभावी सहभाग.

तुकाराम सखाराम भोवड -

१९७२ साली शाळेतील विद्यार्थी, पुढे उपसरपंच म्हणून कार्यरत. ‘नारदमुनी’ची भुमिका अजरामर केली. नमन, झांजगी कार्यक्रमांचे उत्कृष्ट दिग्दर्शन आणि गावातील भजनमंडळ स्थापनेचा मान. पंचायती बैठकींमध्ये न्यायनिवाड्याची महत्त्वाची भूमिका.

सखाराम शिवराम जाधव -

शिक्षणाचे महत्त्व ओळखून ग्रामपंचायत सरपंच म्हणून उल्लेखनीय
कार्य. शेतकरी असून गवंडी कामात निपुण. बौद्ध विहार, बोधिवृक्ष स्थापना आणि सामाजिक समतेचे प्रतिक असलेली जागा त्यांनी साकारली.

२४. भारतीय युद्धात सहभागी (शुरवीर) --

गंगाराम धर्माजी जाधव (जन्म: १५ जुलै १९३८, बौद्धवाडी) हे भारतीय
सैन्य, भारतीय सैन्यदलातील महार रेजिमेंटमध्ये १९६१ ते १९८१ या कालावधीत कार्यरत होते. त्यांनी १९६७ व १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धमध्ये सहभाग घेतला होता.

रामचंद्र विश्राम जाधव (जन्म: २ जून १९४४, बौद्धवाडी) यांनी २२ फेब्रुवारी १९६६ ते जानेवारी १९८३ पर्यंत भारतीय सैन्य भारतीय सैन्यदलातील महार रेजिमेंटमध्ये सेवा केली. त्यांनी भारत-पाकिस्तान युद्ध १९६७ व १९७१ मध्ये सहभाग घेतला होता. त्यांना दीर्घसेवा पदक आणि "लास्ट नाईक" पदवी प्रदान करण्यात आली होती

२५. वन्यजीवनातील निपुणता --

भिवा गंगाराम शिवगण उर्फ उनपाड्या हे सरपटणाऱ्या प्राण्यांबाबतचे ज्ञान असलेले जाणकार व्यक्तिमत्त्व होते. मुंबईत रेल्वे सेवेत कार्यरत असताना, त्यांनी सर्पदंशग्रस्त एका अधिकाऱ्याचे प्राण वाचवले आणि त्याच्या बदल्यात त्यांना कायमस्वरूपी नोकरी देण्यात आली. पुढे त्यांनी हे पारंपरिक सर्पदंश उपचाराचे तंत्र कै. सखाराम ठोंबरे यांना शिकवले, ज्यामुळे ही परंपरा पुढील पिढीकडे पोहोचली.

२६. उल्लेखनीय व्यक्तिमत्व --

कै. सखाराम गंगाराम घोलम व कै. रत्नू सोमा घोलम (१९४७ ते १९६७)
सखाराम घोलम आणि कै. रत्नू सोमा घोलम हे गावातील पराक्रमी व सेवाभावी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात. त्यांची शारीरिक ताकद, निस्वार्थ वृत्ती आणि सामाजिक बांधिलकीमुळे त्यांचा लौकिक गावात "मूलाधार" म्हणून झाला.

गावात मंदिरासाठी दगड वाहणे, शेतीच्या कामासाठी अवजड वस्तू उचलणे,
तसेच उन्मादी किंवा हिंसक बैल आवरणे यांसारखी अवघड कामे सहजतेने व निःस्वार्थपणे करत असत. त्यांचा धैर्यशील व संयमी स्वभाव गावातील तरुणांसाठी आदर्श ठरला.

सामूहिक श्रम, गावच्या गरजा, व विशेष प्रसंगी मदतीस तत्परता ही
त्यांची खास ओळख होती. कोणतीही पदे, पुरस्कार किंवा प्रसिद्धी यांचा मोह न ठेवता त्यांनी संपूर्ण आयुष्य गावाच्या सेवेकरिता समर्पित केले.

गावकऱ्यांच्या स्मरणात आजही हे दांपत्य एक प्रेरणास्त्रोत ठरते. त्यांचे कर्तृत्व, कष्ट व निःस्वार्थ सेवाभाव हा गावाच्या सामाजिक इतिहासाचा महत्त्वाचा भाग मानला जातो.

कै. धर्माजी गंगाराम घोलम - (१९५० ते २०००)

कै. धर्माजी गंगाराम घोलम हे खडीकोळवण गावातील एक दूरदृष्टी असलेले, सामाजिक कार्याशी एकनिष्ठ राहिलेले नेतृत्व होते. साधी राहणी आणि प्रचंड कार्यक्षमतेमुळे ते गावकऱ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय होते. शेतीची कामे करत असतानाही ते गावाच्या विकासासाठी नेहमीच तत्पर राहिले.

सामाजिक आणि राजकीय योगदान ---

* ग्रामपंचायतीचे महत्त्व ते नेहमी समाजाला समजावत असत. सरपंच पद त्यांनी नाकारले व ते १५ वर्षे उपसरपंच म्हणून कार्यरत राहिले.

* शाळा व्यवस्थापन समितीचे (चेरमन) सदस्य म्हणून त्यांनी अनेक वर्षे सेवा दिली.

* १९८२–८३ मध्ये श्री. देव गांगेश्वर मंदिराजवळील पूल वाहून गेल्यावर, त्यांनी तत्काळ उपाययोजना करत आमदार श्री. मुसा मोडक यांच्या मदतीने पूल मंजूर करून घेतला.

* नळपाणी योजना गावात राबवण्यासाठी स्वतःची जमीन दिली, जेणेकरून
योजना दुसऱ्या गावात न जावी.

* बौद्ध वस्ती, घोलम वाडी आणि रामवाडीसाठी स्वतंत्र विहिरी मंजूर करून दिल्या.

विकासाचे योगदान---

* खडीकोळवण गावातील मुख्य रस्ता, विरोध असूनही गावासाठी तयार करून घेतला.

* "न्यू इंग्लिश स्कूल, खडीकोळवण" (इ. ८वी–१०वी) या शाळेच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता.

* गावातील कडिपत्ता, करवंद, वेत व जंगल व्यवसाय यामधून शेतकऱ्यांना भाव मिळावा यासाठी प्रयत्न केले. आसपासच्या गावांमध्ये न्याय निवाडा करणारे म्हणून ओळखले जात असताना गावाने त्यांना न्यायानिवडा पंच असे संबोधले होते.



२७. समसामयिक सामाजिक स्थिती--

खडीकोळवण गावात पुर्वी प्रमाणे ऐकत्मेची माणुसकीची, आदर,सन्मान, आपुलकीची, अकोप्याची भावना व विचार दुरापस्त वाढता वाडी वाडीतील या अंतर्गत संघर्षामुळे गावात एकोप्याची भावना कमी होत गेली असून विकासकामांकडे दुर्लक्ष झाले आहे. आजही गावात पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो — जसे की शुद्ध पाणीपुरवठा, उत्तम आरोग्यसेवा, उत्तम शिक्षण सुविधा आणि तांत्रिक संपर्क यंत्रणा यांचा अभाव.खडीकोळवण गावात पूर्वीची ग्रामीण जीवनपद्धती एक वेगळं वैभव मांडणारी होती. वेशभूषा, राहणीमान, जीवनधारणा व सामाजिक व्यवस्था ह्या सर्व गोष्टींनी एक विशिष्ट ठसा गावकऱ्यांच्या जीवनावर उमटवला होता.

२८. पारंपरिक वेशभूषा -

पुरुष - पूर्वी बहुतेक पुरुष पावसाळ्यात बारीक लंगोट किंवा खोचलेली कोपरपट्टी नेसत असत. कमरेला सोगा किंवा कंबरेला खोचलेली लुगडी, अंगात बनियन किंवा शर्ट नसायचा. सणासुदीच्या दिवशी मात्र पुरुष धोतर, शर्ट, टोपी आणि कपड्याचा अंगावरचा टॉवेल वापरत.

स्त्रिय - रोजच्या वापरासाठी

स्त्रिया - नऊवारी साडी गुंडाळून घालत आणि कास मारीत.डोक्यावर कायम
पदर, कमरेला लपवलेला बटवा, आणि पायात साखळी व जोडवी. सणासुदीला "बामणोली पद्धतीने" पायभर नेसलेली नऊवारी, कपाळावर आडवे कुंकू, हातभर बांगड्या, पायात साखळ्या, गळ्यात डवली, वाक्या, मंगळसूत्र, डोळ्यात काजळ, नाकात नथ – अशी पारंपरिक सजावट असे. स्त्रियांच्या अंगावर गोदण - गोंदण असायचं.

पावसाळी उपाय - अंगावर ईरल म्हणजे झाडाच्या पानांचं झाकण, कधी पिशवी किंवा प्लास्टिकचा कागद घालायची पद्धत.

२९. खाद्यसंस्कृती -

गावात भात, नाचणी, वरी, हरीक हे मुख्य अन्नधान्य होते. याशिवाय
भाजीपाला आणि मासे यांचा आहारात मोठा वाटा होता.

शाकाहारी भोजनात – वरण, डाळ, सांबार, मोड आलेली डाळ, अळूचं फतफदं, पिठलं, कढी, कचली, विविध प्रकारचे सार आणि भाजी यांचा समावेश होता.

मांसाहारी जेवणात – नदीमधून पकडलेली मासळी, त्याचे विविध प्रकार (सुकट भाजी, कालवण, कोरडे प्रकार) लोकप्रिय होते. कोण पाहुणा आला तर तलंग - कोंबडीचे लहान पिल्लू, कोंबडी कापली जायची. पाणी उपसण्यासाठी दोन दोरीची झाडे, मासे पकडण्यासाठी टोका, इंद, धडधड, खोखोईन यासारखी पारंपरिक उपकरणे वापरली जात.

३०. सामाजिक व सांस्कृतिक जीवन -

गावातील लोकसंगीत, जाखडी नाच, भजन, नमन, पारंपरिक सण जसे की शिवजयंती, बौद्ध पौर्णिमा, आंबेडकर जयंती साजरे करण्याची परंपरा होती. ढोलकी, झांज,

लावणी आणि नाट्यप्रकार हे अनेक पिढ्यांचे सांस्कृतिक ठसे आहेत. महिलांनी सामाजिक समारंभांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

३१. गावातील सांस्कृतिक परंपरा -

नमन, झांजगी, ताशा, कलगी व वारकरी संप्रदाय.

गावातील जुने कलावंत कै. आबा पाटील यांनी झांजगी आणि ताशा वादनाच्या सांघिक परंपरेची पायाभरणी केली. त्यांच्या पुढाकारातून *काशिकर वाड्या* आणि इतर वाड्यांतील कलाकारांनी आपापल्या वाडीचे स्वतंत्र वाजंत्री संघ तयार केले.

गावातील काही प्रमुख ताशावादक व झांजगी कलाकारांमध्ये: - आबा पाटील, सखाराम पाटील, गंगाराम जयराम, सिताराम घोलम (कोतवाल), राम माईन, सखाराम खाडे, यशवंत खाडे यांचा समावेश होतो. या कलाकारांनी लग्न समारंभ, शिमगा व गणपती उत्सवाच्या वेळी सुमारे *५२ पारंपरिक ताशा चाली* जतन करून ठेवल्या.

ताशावादनामध्ये *काठी वाजवण्याचे विशिष्ट हावभाव* आणि तालबद्ध नृत्यप्रकार हे या परंपरेचे खास वैशिष्ट्य होते.

३२. कलगी / शक्तीवाले परंपरा -

खाडेवाडीतील *कलगी / शक्तीवाले* परंपरा ही एक भक्तिपर परंपरा असून
अनेक दशके टिकून राहिलेली आहे.

कै. सखाराम खाडे (खाडे बुवा) हे *शंकरनाथ परंपरेचे* वारसदार होते. त्यांनी *वारकरी संप्रदायात* प्रवेश करून विलेपार्ले (मुंबई) येथे आध्यात्मिक कार्य सुरू केले. तिथे त्यांनी प्रवचन, भजन, आणि ग्रंथकथांचे नियमित सादरीकरण करून आध्यात्मिक वातावरण निर्मिती केली.

माजी पोलीस पाटील *शंकर खाडे* यांनी देखील डफावरील शक्ती गाण्यांचे सादरीकरण केले. *विठोबा सोमा खाडे* यांनी *जाखडी नाच* व शक्तीवाले परंपरेचा जोमाने विस्तार केला.

या परंपरा *श्रावण, गणेशोत्सव, महालवस (पितृपक्ष), आणि दसरा* या
काळात अधिक जोमाने साजऱ्या केल्या जात.

३३. निरक्षर स्त्रियांचे जीवन व योगदान -

पारंपरिक ग्रामीण भागात स्त्रियांचे जीवन अत्यंत कष्टाचे होते. त्यांचा दिनक्रम पहाटेपासून रात्रीपर्यंत विविध घरगुती व शेतीविषयक कामांमध्ये जात असे. बाळंतपणात मदत करणाऱ्या "आया" (उदा. रामो काकू, परबते आजी) यांचं योगदान मोठं होतं. याशिवाय अनसूया घोलम, गोसावी आजी, अंबु गोसावी इत्यादींनी आरोग्य, संगीत, व परंपरा जपण्यात महत्त्वपूर्ण कार्य केलं.

गावात सर्पदंश, कावीळ, मुर्दुस यांसारख्या आजारांवर पारंपरिक वैद्य व आजीबाई उपाय करत असत. औषधी वनस्पती, पाणीउपचार, झाडांची पाने, अंधश्रद्धा विरहित उपाय यांचा वापर केला जाई. सुतार, घोलम, ठोंबरे कुटुंबे अशा

उपचारांमध्ये अग्रेसर होती.आज ही कोकणातील आरोग्य व्यवस्था समाधानकारक

नाही. गंभीर उपचारासाठी मोठ्या शहरात जावे लागते

३४. शेती आणि स्थलांतर -

पूर्वी शेती हा गावाचा मुख्य व्यवसाय होता, परंतु आता गावातील तरुण पिढी स्थलांतरित झाल्यामुळे शेतीसाठी आवश्यक मनुष्यबळ मिळत नाही. परिणामी, अनेक शेतीची जमिनी ओस पडल्या आहेत. पूर्वी जनावरांसाठी असलेले वाडे आता मोडकळीस आले आहेत, तर काही वाड्यांवर नवीन घरे बांधली गेली आहेत. गावाची जुनी ओळख आणि पारंपरिक जीवनपद्धती हळूहळू लोप पावत आहे.शेती संकटात आली.

३५. मिरगाची राखण - रखवाली -

खडीकोळवण गावात मृग नक्षत्राच्या काळात (सुमारे जून महिना) शेतीची सुरुवात करताना ग्रामस्थ आपली ग्रामदेवता, कुलाचार, आणि पूर्वजांना नारळ व कोंबडीचा नैवेद्य अर्पण केला जातो. याला "मिरगाची राखण" म्हणतात. पाण्याच्या अखंड वाहत्या धारेची सुरुवात होताच देवतेला पहिली राखण अर्पण केली करून सुखासाठी, भातशेती रक्षणासाठी गाऱ्हाणे एकत्रित किंवा एकट्याने घालतात ते असे -

"देवा महाराजा, ही तुझी जागा, आम्ही संकरा करत आहोत, आता शेतीला
सुरुवात करतो. मुलाबाळांची रोता, भाताची तू रखवाली कर, गुरं सांभाळ, पाणी- पिक भरभरून येऊ दे."

या श्रद्धा व आशेने शेतीची सुरुवात होत असे. या काळात गावातील अनेक शिवारांतून "राखणीची गाणी" ऐकू यायची.

मिरगाची राखण म्हणजे काय?

शेतात रात्रंदिवस माणूस ठेवून उभ्या पिकांचे संरक्षण करणे म्हणजे
राखण. यासाठी झोपडी बांधली जाई. सणासुदीला ही राखणही देवाच्या धाग्याने जोडलेली असे.गावात भात पेरणीपूर्वी रोवलीत बी भरून, ग्रामदेवतेला प्रार्थना करून बियाणे पेरले जाते. महिला मातीची दीपळ फोडत आणि माती समतल करतात. हा विधी मिरगाची राखण म्हणून ओळखला जातो. नदीला ‘साखळी’ गेल्यावर राखण दिली जाते. यामुळे ग्रामदेवतेची कृपा पिकावर राहील, असा विश्वास आहे.

३६. परंपरागत जलव्यवस्था -

बावोचा गोवंड – जलसंधारण व रहाट पद्धती

बावोचा गोवंड हा गावाच्या शेतीसाठी महत्त्वाचा भूभाग. बाव म्हणजे
विहीर आणि "गोवंड" म्हणजे जनावरांची मुख्य येजा वाट. हाच कच्चा रस्ता जनावरे व लोक वापरत असत.

कोळब्याची बाव - म्हणजे माडाच्या बुंध्याला आतून कोरून तयार केलेला पाण्याचा डबा, ज्यात रहाट पद्धतीने विहिरीतून पाणी काढले जाई. हे पाणी पुढे दोडी किंवा दौणी नावाच्या लांबट झाडाच्या खांड्यात साठवले जाई आणि त्यातून जनावरे पाणी पीत.

बुडवणूकीची बाव - पावसाआधी बुडवणूकीची बाव म्हणजे तिरकी विहीर – ती महिलांना सहज उतरता यावी अशा रचनेत खोदलेली असे. यातून हंडा-घागर सहज बुडवून पाणी काढता येई. हे पाणी पावसाआधी शेत रोप लावण्यासाठी वापरले जाई.

□□ □□ □□□□□□□ □□□□□□□ □□□□□□□□□□ □□□ □□□□. □□□□□□ □□□□□□□ □□□□□ □□□□□□ □□□□. □□□□□□□ □□□□□□ □□□□□□□ □□□□□□□□□□ □□□□□□□□ □□ "□□□□", "□□□□", "□□□□□□□□", "□□□□□□", "□□□□□□□□" □□□ □□□ □□□□□ □□□□□□□□□ □□□ □□□□.

**□□□□□□□□ □□□□□□ □ □□□□□□□□ -**

□□□□□□□□□□ □□□□□□ □□□□□ □□□□□□□□□□ □□□□□□ (□□□□□□□□□□ □□□□□ □□□□□□□□/□□□□ □□□□) □□□□. □□□□□ □□□□□□□ □□□□□□□□□ □□□□:-- □□□□□□□□□ □□□□, □□□□□□□ □□□□, □□□□□□□ □□□□, □□□□□□ □□□□, □□□□□□□□ □□□□, □□□□□□□□ □□□□, □□□□□□□ □□□□, □□□□□□□ □□□□, □□□□□□□ □□□□, □□□□□□□□ □□□□, □□□□□□□ □□□□, □□□□□□□ □□□□, □□□□□ □□□□, □□□□□□□ □□□□, □□□□□□□□ □□□□, □□□□□□□□ □□□□, □□□□□□□□□□□□ □□□□, □□□□□□□□□ □□□□, □□□□□□□ □□□□, □□□□□□□□ □□□□, □□□□□□□□□ □□□□, □□□□□□□□□□ □□□□, □□□□□□□□□ □□□□, □□□□□□□□ □□□□ □□□□□□□□. □□ □□□□□ □□□□□□□□ □□□□□□□□□□ □ □□□□□□□□□□□□ □□□□□□□□□□□ □□□□□□□□□□ □□□□□□□ □□□□□□□□ □□□□□ □□□□□

**□□. □□□□□□□□□□□ □□□□□□□□□ □□□□□□ -**

□□□□□□□□□□ □□□□–□□□□□□ □□□□□□□□□□ □□□□□ □□□□□ □□□□□□□□□□□□□ □□□□□ □□□□□□□ □□□□□□. □□□□□□□□ □□□ □□ □□□□□□□□□□ "□□□□□□□ □□□□□" □□□□□□□□. □□□□□

पकडण्यासाठी बांधन, पाळणे, टोके अशी पारंपरिक साधने वापरली जातात. नदीच्या वाहत्या प्रवाहात टोके लावून मासे सहज पकडले जातात. मासेमारीत सहभाग हा गावच्या एकात्मतेचे प्रतीक मानले जाते.आज ही अनेकांना गावाच्या नदीमधील मासे खाण्याचा आनंद मिळतो.

चढणीचे मासे

३८. पारंपरिक साकव व शेती कामकाज -

पूर्वी पावसाळ्यात नदी ओलांडण्यासाठी लाकडी साकव उभारले जात. हे
साकव गावाला शेतीकडे नेणारा महत्त्वाचा दुवा ठरत. साकव वाहून गेल्यास लोक नदी पार करत असत. बैलांना पाण्यातून उतरवून नेत असत आणि गावातील कुशल पोहणारे तरुण ही जबाबदारी निभावत.अनेकवेळा पावसात साकव कोसळण्याच्या घटना वरचेवर घडतात.



३९. इतिहासातील हरवलेली कुटुंबे व पारंपरिक जीवनपद्धती -

गावात पूर्वी अनेक आडनावे व कुटुंबे होती, जी आता गावातून लुप्त
झाली आहेत. यामध्ये पुढील कुटुंबांचा समावेश होतो:

जोशी आडनावाचे कुटुंब - सुमारे १०० वर्षांपूर्वी हे कुटुंब गावात वस्तीला होते. त्यांची वाडी बावीच्या गोवडाकडील टेकाडावर होती. त्यांनी लागवड केलेल्या मोठ्या फणसाच्या झाडाला "जोयशाचा फणस" असे नाव आजही ग्रामस्थ वापरतात.

गावाच्या इतिहासात पूर्वी अनेक आडनावे व कुटुंबे होती, जी आज गावातून लुप्त झाली आहेत. त्यांच्या वास्तव्याचे उल्लेख आजही लोकस्मरणात आहेत.

देगण कुटुंब – गावात शंभर वर्षांपूर्वी स्थायिक. त्यांचे घर गोसावी यांच्या घरामागे होते. आजही त्यांचे घराचे जोते (पायाभूत बांधकाम) अस्तित्वात आहे.

पाकतेकर आणि एकतेकर कुटुंब – वाण्याच्या गल्लीतील साठल्याच्या घरासमोर त्यांचे वास्तव्य होते. सुमारे ७५ वर्षांपूर्वीचे अस्तित्व.

मालप (मलाप) कुटुंब – हे कुटुंब ५० वर्षांपूर्वी गावात होते. त्यांचे घर आजही अवशेष स्वरूपात दिसते.

४०. पारंपरिक जीवनशैली व स्थानिक कारागिरी -

पूर्वी गावाचे जीवन पूर्णतः निसर्गाशी संलग्न होते. शेती, गुरेढोरे,
आणि स्थानिक साहित्यनिर्मिती हीच ग्रामजीवनाची ओळख होती. बांबूपासून तयार होणाऱ्या वस्तू - गावात बांबूपासून अनेक उपयोगी वस्तू तयार केल्या जात: - टोपली, सुप, हारा, चाळण, डोरली, पाळणे, टोका, डोंब, खोईन, धाबड, घळ, इत्यादी. ही सर्व कारागिरी गावातील कुटुंबांमध्ये पारंपरिक पद्धतीने शिकवली जात. आज या वस्तू दुर्मीळ झाल्या आहेत आणि प्लास्टिक व मशीनने तयार होणाऱ्या वस्तूंनी त्यांची जागा घेतली आहे.

मातीची भांडी - भूतकाळात सर्वसामान्य वापरात असलेली मातीची भांडी ही स्थानिक कारागिरीचे प्रतीक होती: - मटका, माठ, बिनगा, माट, तवा, पडगा, तपेली, खापर, राजण, बुडकूला, इत्यादी.

आज या भांड्यांची जागा आधुनिक स्टील, अल्युमिनियम आणि प्लास्टिकने घेतली आहे, परंतु परंपरेतील त्या भांड्यांचे शास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्यदायी फायदेही लक्षात घेण्यासारखे आहेत.

पूर्वी गावाचे जीवन पूर्णतः - निसर्गाशी संलग्न होते. शेती, गुरेढोरे, आणि स्थानिक साहित्यनिर्मिती हीच ग्रामजीवनाची ओळख होती.

४१. सांस्कृतिक व धार्मिक उपक्रम जतन -

आज गावातील अनेक पारंपरिक परंपरा, कारागिरी, आणि सामाजिक व्यवस्था काळाच्या ओघात मागे पडत आहेत. तरीही कोकणात काही गावकरी पुरातन अजूनही सांस्कृतिक व धार्मिक उपक्रम जपून ठेवत आहेत.

खडीकोळवण गावात सामाजिक एकजूट आणि सांस्कृतिक कार्यक्रम
सांस्कृतिक सहभाग वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवले गेले आहेत. अशाच उपक्रमांपैकी एक म्हणजे गावातील तरुण पिढीने पुढाकार घेऊन स्थापन केलेले "गर्जना मित्र मंडळ". या मंडळाची स्थापना १ सप्टेंबर १९९९ रोजी झाली.

या गणेशोत्सव सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या स्थापनेत कै. नामदेव जयराम शिवगण, अनिल शांताराम घोलम, समीर सखाराम घोलम, विश्वनाथ अनंत घोलम, संजय (नित्या) सिताराम गुरव, संतोष नारायण घोलम, रवींद्र राजाराम घोलम यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

या मंडळाची सुरुवात शाळेजवळील लाकडी बाकावर बसलेल्या चर्चा-
गोष्टीतून झाली. वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील तरुण एकत्र येऊन त्यांनी सामाजिक कार्य, सांस्कृतिक कार्यक्रम व सार्वजनिक गणेशोत्सवाच्या आयोजनातून गावात ऐक्य, सलोखा आणि संस्कृतीचा जागर केला. आज "गर्जना मित्र मंडळ" हे गावातील एक महत्त्वाची सामाजिक संस्था|सामाजिक-सांस्कृतिक संस्था म्हणून ओळखले जाते‘

गावातील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव -

९ सप्टेंबर १९९९ रोजी, खडीकोळवण गावात "गर्जना मित्र मंडळ" या
नवस्थापित सामाजिक संस्था वतीने पहिला गणेशोत्सव साजरा करण्यात आला. तालुक्यातील पहिल्या पाच सार्वजनिक गणेशोत्सवांपैकी एक म्हणून या उत्सवाची नोंद झाली आहे. या उत्सवाचे आरंभकर्म भ.प. पांडुरंग यांच्या मंत्रोच्चारांनी झाले. त्यानंतर अभिषेक, आरती, सत्यनारायण पूजन, तसेच भजन, फुगड्या, टिश्यू नृत्य, अभंगवाणी यांसारखे विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

या गणेशोत्सवाच्या आयोजनातून गावात सामाजिक ऐक्य, सहकार्य आणि सांस्कृतिक जाणीवेचा प्रसार करण्यात मंडळाने महत्त्वाची भूमिका बजावली.

यानंतर दरवर्षी हा उत्सव साजरा केला जात आहे आणि मंडळाने सामाजिक कार्य आणि सांस्कृतिक जपणूक यावर भर दिला आहे.

४२. तंटामुक्त गाव अभियान -

ग्रामपंचायतीने महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान प्रभावीपणे राबवले आहे. हे अभियान महाराष्ट्र शासन शासनामार्फत १५ ऑगस्ट २००७ पासून सुरू झाले असून ग्रामस्थांमधील तंटे, गैरसमज, वाद कोर्टकचेरीपर्यंत न नेता गाव पातळीवरच सामोपचारने सोडवण्यावर भर देण्यात येतो.

ग्रामस्तरीय तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी यापूर्वी
या व्यक्तींनी पार पाडली आहे:

* श्री. संतोष रामचंद्र पांचाळ

* श्री. सुरेश धोंडू घोलम

* श्री. राजाराम नारायण शिवगण

गावाच्या सलोख्याच्या वाटचालीत या सर्वांच्या भूमिका उल्लेखनीय ठरल्या आहेत.

सद्याचे अध्यक्ष: - श्री. सिताराम गुणाजी खाडे यांची नुकतीच या पदावर निवड झाली आहे

४३. आंतरराष्ट्रीय निबंध स्पर्धा विजेता-

खडीकोळवण गावातील रोहन अनिल घोलम याने आंतरराष्ट्रीय स्तरावर
निबंध लेखनात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. "Save Nature for Your Better Future" या विषयावर त्याने लिहिलेल्या इंग्रजी निबंधाची निवड Climate Ambassador Society नॉर्वे-नेदरलँड्स या संस्थेच्या आंतरराष्ट्रीय निबंध स्पर्धेसाठी झाली. या स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक मिळवला असून,

त्याचा निबंध संस्थेच्या अधिकृत प्रकाशनात प्रकाशित करण्यात आला आहे



खडीकोळवण - गाव लेख वाचल्या बद्दल आभार